अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
११.०८.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

वर्ष: ०७ | अंक: १९२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712

## थोडक्यात

### दहीहंडी ऐवजी रक्षाबंधनला सुट्टी : ऑगस्ट अखेरीस मिळणार तीन दिवसांचा ब्रेक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुट्टीच्या कॅलेंडरमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने यंदा गोपाळकाला अर्थात दहीहंडीची स्थानिक सुट्टी रद्द करून त्याऐवजी रक्षाबंधनसाठी सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ रोजी मुंबईतील संबंधित सरकारी आणि निमशासकीय कार्यालयांना स्थानिक सुट्टी असेल. सामान्य प्रशासन विभागाने १० ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शुद्धीपत्रक जारी केलं आहे.


## येवला पैठणीचा राष्ट्रीय सन्मान

# राष्ट्रपती मुर्मूंच्या हस्ते येवला पैठणीचे टपाल तिकीट प्रकाशित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**राजस्थान** – महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेची जगभर ओळख निर्माण करणाऱ्या नासिक जिल्ह्यातील येवला पैठणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित १२ व्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येवला पैठणीच्या स्मरणार्थ विशेष टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले.




**येवला पैठणी – महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक**

येवला पैठणी ही केवळ साडी (पैठणी) नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानली जाते. हातमागावर अत्यंत कौशल्याने आणि बारकाईने विणली जाणारी पैठणी आपल्या पारंपरिक नक्षीकामासाठी देशभर प्रसिद्ध आहे. मोर, कमळ, आसावली, नारळी आणि मुनीया यांसारख्या पारंपरिक नक्षींमुळे येवला पैठणीला वेगळी ओळख मिळाली आहे. पिढ्यांपिढ्या विणकर आणि कारागिरांनी ही कला जपल्यामुळे आज येवला पैठणी राष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे.

**हजारो कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याला बळ**

येवल्याची ओळख देशाच्या वस्त्रोद्योगाच्या नकाशावर अधिक ठळक व्हावी आणि पैठणी उद्योगाला आधुनिक काळानुसार नवी दिशा मिळावी, यासाठी मंत्री छगन भुजबळ सातत्याने प्रयत्नशील आहेत. पैठणी हा येवल्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून या उद्योगाशी हजारो विणकर, कारागीर, व्यापारी आणि विविध घटक जोडलेले आहेत. त्यामुळे पैठणी उद्योगाचा विकास म्हणजे केवळ एका पारंपरिक कलेचा विकास नसून हजारो कुटुंबांच्या रोजगाराला आणि आर्थिक स्थैर्याला बळ देणे आहे.

**पैठणी पर्यटन केंद्रामुळे नवी ओळख**

येवल्यात पैठणी पर्यटन केंद्र विकसित करण्याच्या माध्यमातून पर्यटकांना पैठणी तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया जवळून अनुभवता यावी, पैठणी निर्मितीचा इतिहास आणि परंपरा समजावी, कारागिरांशी संवाद साधता यावा आणि थेट पैठणी खरेदी करता यावी, यावर भर देण्यात येत आहे.

पैठणी पर्यटन केंद्रामुळे येवल्याला केवळ पैठणी खरेदीचे केंद्र म्हणून नव्हे, तर 'पैठणी नगरी' म्हणून पर्यटनाच्या नकाशावर विकसित करण्यास मोठी मदत होत आहे.

# 'शहरीकरण समस्या नाही, मोठी संधी'

## ब्रिक्स देशांतील शहरांनी नवकल्पनांतून विकास साधावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शहरे म्हणजे केवळ विटा आणि काँक्रीटच्या रचना नाहीत, तर ती देशाच्या आर्थिक प्रगतीची ग्रोथ इंजिन्स आहेत. त्यामुळे शहरीकरणाकडे समस्या म्हणून नव्हे, तर मोठी संधी म्हणून पाहिले पाहिजे. जगभरातील शहरांसमोरील आव्हाने मोठ्या प्रमाणात समान असल्याने त्यावरील उपायही देशांच्या सीमांच्या पलीकडे जाऊन शोधण्याची गरज आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मुंबईतील वरळी येथे आयोजित 'ब्रिक्स फ्रेंडशिप सिटीज कॉन्क्लेव्ह २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन झाले. 'मुंबई फर्स्ट' या संस्थेने आयोजित केलेल्या या परिषदेत ब्रिक्स देशांतील शहरांचे प्रतिनिधी, महापौर, नगर नियोजन तज्ज्ञ आणि शहरी विकास क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले आहेत.

संत तुकाराम महाराज यांच्या 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीचा संदर्भ देत एकनाथ शिंदे यांनी ब्रिक्स देशांतील शहरांनी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून विकासाचा नवा मार्ग तयार करण्याचे आवाहन केले. लवचिकता, नवकल्पना, सहकार्य आणि शाश्वततेच्या माध्यमातून २१व्या शतकातील नागरिककेंद्रित शहरे उभारण्यासाठी ब्रिक्स देशांनी आपले अनुभव, तंत्रज्ञान आणि नवकल्पना एकमेकांशी सामायिक कराव्यात, असे त्यांनी सांगितले. मुंबई ही भारताच्या आकांक्षांची राजधानी असून मेहनतीचा सन्मान, विविधतेचा आदर आणि संकटांशी सामना करण्याची जिद्द ही या शहराची ओळख आहे, असे शिंदे म्हणाले. जागतिक दर्जाच्या मुंबईत ब्रिक्स परिषदेचे आयोजन होणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगत त्यांनी विविध देशांतील शहरांनी एकमेकांकडून शिकावे, अनुभवांची देवाणघेवाण करावी आणि भविष्यातील भागीदारीला नवी दिशा द्यावी, असे आवाहन केले.

## सिंधुदुर्गात एफडीएची जोरदार कारवाई

# १२ जणांना 'व्यवसाय बंद'च्या नोटिस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सिंधुदुर्ग** – जिल्ह्यातील हॉटेल रेस्टॉरंट आणि अन्य खाद्य आस्थापनांविरुद्ध अन्न आणि औषध प्रशासनाने गेल्या तीन महिन्यात८२ तपासण्या केल्या असून १२ जणांना 'व्यवसाय बंद'च्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. या कारवाईतून एकूण एक लाख २० हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. या कार्यालयाने गुटखा विरोधी मोहिमही मोठ्या प्रमाणावर हाती घेतली असून आतापर्यंत सहा जणांवर कारवाई करून एकूण २२



लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा विरोधी ही सर्वात मोठी कारवाई समजली जाते. या कार्यालयाने आतापर्यंत विविध आस्थापनांकडून ४७ नमुने घेतले असून त्यापैकी १९ जणांना जणांना सुधारणा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत तर १२ व्यवसयांना बंदच्या नोटीसाही देण्यात आल्या आहेत.

# आई...अथर्वला माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवायचेत : तरुणीचा आईला फोन आणि काही तासांत मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्याच्या बारामतीत २३ वार्षीय युवतीच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी अथर्व नावाच्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मृत्यूपूर्वी काही तास अगोदर संबंधित युवतीनेआपल्या आईला फोन करून, अथर्व तिला गोळी खाण्यास देणार असल्याचं सांगितल्याचा दावा तिच्या आईने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत केलाय. ६ ऑगस्ट रोजी ही महिला अथर्वसोबत बाहेर गेली होती. त्यानंतर रात्री तिची प्रकृती अचानक बिघडल्याचं सांगत तिला बारामतीतील विविध




रुग्णालयांमध्ये उपचारासाठी नेण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर महिलेच्या आईने अथर्व राजेंद्र मेहन याच्यावर गंभीर संशय व्यक्त करत पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार बारामती शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विरारमध्ये बनावट नोटांचा मोठा पर्दाफाश! १ कोटींच्या नकली नोटा जप्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई – क्राईम ब्रँच युनिट-२ ने मुंबई-अहमदाबाद महा मार्गावर मोठी कारवाई करत १ कोटी रुपये दर्शनी मूल्य असलेल्या बनावट नोटांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत तब्बल २० हजार बनावट ५०० रुपयांच्या नोटा पोलिसांच्या हाती लागल्या आहेत. शिरसाट फाटा पुलाखाली ही कारवाई करण्यात आली.**

मिळालेल्या माहितीनुसार, क्राईम ब्रँचच्या पथकाने संशयावरून एका वाहनाची तपासणी केली. यावेळी वाहनातील एका बॅगेत मोठ्या प्रमाणात बनावट नोटा आढळून आल्या. पोलिसांनी तातडीने हा साठा ताब्यात घेतला.

**३० लाखांत विक्रीचा कट उधळला**

१ कोटींच्या नोटा, बाजारात ३० लाखांत विक्रीचा प्लॅन प्राथमिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. जप्त करण्यात आलेल्या बनावट नोटा बाजारात सुमारे ३० लाख रुपयांना विकण्याचा कट असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. म्हणजेच, बनावट नोटांचा मोठा साठा बाजारात चलनात आणून आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे प्राथमिक तपासातून समोर येत आहे.



एक संशयित ताब्यात : या प्रकरणात पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. या बनावट नोटा नेमक्या कुठून आणण्यात आल्या, त्या कोणाकडे पोहोचवण्यात येणार होत्या आणि या रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे.

वसई क्राईम ब्रँचकडून आता या संपूर्ण प्रकरणाच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. बनावट नोटांचा पुरवठा करणारा मुख्य सूत्रधार कोण आहे, या नेटवर्कमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे आणि बनावट नोटा छापण्यामागे किंवा त्यांची वाहतूक करण्यामागे कोणती टोळी कार्यरत आहे, याचा शोध घेतला जात आहे.

# सांगली जिल्ह्यात शाळकरी विद्यार्थ्यांच्या वाहनाला अपघात, ६ वर्षीय चिमुकली ठार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सांगली** – मुंबईत गेल्या महिन्यात शाळेच्या बसवर झाड कोसळून एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटनेनंतर सर्वच स्तरातून संताप व्यक्त करण्यात आला, तसेच मुंबई महापालिकेनं घटनेसंदर्भाने काही अधिकाऱ्यांवर कारवाया देखील केल्याचं पाहायला मिळालं. आता, सांगली जिल्ह्याच्या शिराळा तालुक्यातील आटूगडेवाडी येथे चारचाकी स्कूल व्हॅनच्या चालकाचा ताबा सुटून झालेल्या अपघातात सहा वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची हृदद्रावक घटना घडली. तर, व्हॅनमधील इतरही मुले देखील जखमी झाली असून, त्यांच्यावर कोकरूड, शिराळा आणि कराड येथील विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. घटनास्थळावरून माहितीनुसार, शिराळा येथील सह्याद्री पब्लिक स्कूलची इंग्रजी माध्यमाची दुसरी शाखा वाघमारेवाडी येथे वर्षभरापूर्वी सुरू झाली आहे.



## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

### एकलव्य स्पोर्ट्स अकादमीच्या

# दोघांची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे पार पडलेल्या ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये एकलव्य स्पोर्ट्स अकादमी वरुडच्या दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

येथील विद्यार्थिनींनी एथलेटिक्स क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये दीप्ती संजय कासे ८०० मीटर व ३००० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक, गीत वानखडे १०० मीटर द्वितीय क्रमांक व २०० मीटरमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा, पालक तसेच प्रशिक्षकांचे नाव अभिमानाने उंचावले आहे. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींची राज्यस्तरीय अथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशासाठी मुख्य क्रीडा प्रशिक्षक ओम कासदेकर तसेच विद्यार्थी क्रीडा प्रशिक्षक विक्कीसिंग अंद्रेले, कोमलसिंह बघेल (यवतमाल) यांचे मार्गदर्शन लाभले.

### शहापूर येथे

# विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाची संघटन बैठक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – विश्व हिंदू परिषद बजरंग दल, अमरावती ग्रामीण अंतर्गत वरुड प्रखंड शाखा शहापूर येथे संघटन बैठक नुकतीच मोठया उत्साहात पार पडली. यावेळी शाखेचे तसेच बजरंग दलाच्या फलकाचे उदघाटन करण्यात आले.

बैठकी दरम्यान शहापूर शाखेच्या विविध दायित्वांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये प्रवीण लाड अध्यक्ष, भारत बघिले संयोजक, महेश शेंद्रे सहसंयोजक, आकाश मसराम गौरक्षा प्रमुख, गोपाल बघिले धर्म प्रसार प्रमुख, विशू उईके विद्यार्थी प्रमुख, सौरभ खंडारे मंत्री, शुभम फुले बल उपासना प्रमुख तर अजय रोहने यांची सेवा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

यावेळी बल उपासना प्रमुख विक्रमसिंह ठाकूर, नरेश घोरसाडे, सहधर्मप्रसार प्रमुख नितीन कुबडे, संयोजक योगेश अडलक, सुकेश भोपती, मॉन्टी नागदेवे, भारत तुमडाम, श्रावण, अक्षय गणोरकर, भोजराज यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत संघटनात्मक कार्याला बळकटी देण्यासह आगामी काळातील विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# सुलोचना काकणे यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिवरखेड** – येथील प्रतिष्ठित नागरिक महादेव काकणे यांच्या पत्नी सुलोचना काकणे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निर्मिक स्मशानभूमीत आप्तेष्ट, स्वकीय, नातेवाईक आणि ग्रामवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्याचे मागे पती, ३ मुले, सुन, १ मुलगी, जावई, नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# जितेंद्र शेटीये यांचा वाढदिवस दिव्यांग व मतिमंद विद्यार्थ्यांसोबत उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – नरखेड येथील लोकमान्य मतिमंद निवासी विद्यालय या शाळेत कार्यरत असलेले समाजसेवक जितेंद्र शेटीये यांचा वाढदिवस दिव्यांग मतिमंद विद्यार्थ्यांसोबत उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले तसेच केक कापून व विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करुन आनंद साजरा केला. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जितेंद्र शेटीये यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जितेंद्र शेटीये यांनी मला दिव्यांग मतिमंद मुलांच्या शाळेत काम करण्याची संधी मिळाली असल्यामुळे दिव्यांग मतिमंद मुलांचे कार्य करण्याकरिता मी सदैव तत्पर आहे या ठिकाणी माझा वाढदिवस विद्यार्थ्यांसह सर्व कर्मचाऱ्यांनी अति उत्साहाने साजरा केल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो असे मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापिका मीना बोंद्रे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी फलिंद्र चांदेकर, विलास काळे, सुनिल मानकर, अमोल पवार, राजेंद्र पेठे, हेमंत गेडाम, दीनदयाल कुमेरिया, हेमंत गेडाम, देवेंद्र ढोकणे, अर्चना साळवे, वैशाली चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विशेष शिक्षक फलिंद्र चांदेकर यांनी केले.

# गडचिरोलीत सर्पदंशाने तीन मुलींचा मृत्यू : आदिवासी आश्रमशाळेतील प्रकार

### ३ जणींवर उपचार सुरू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**गडचिरोली** – गडचिरोली जिल्ह्यातील एका अनुदानित आदिवासी आश्रमशाळेच्या वसतिगृहात मध्यरात्री ६ विद्यार्थिनींना विषारी साप चावल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या सर्पदंशामुळे तीन मुलींचा मृत्यू झाला असून, तीन विद्यार्थिनींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. ही घटना धानोरा तालुक्यापासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेल्या जपतलाई येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेच्या वसतिगृहात रविवारी मध्यरात्री घडली. वसतिगृहात जमिनीवर झोपलेल्या विद्यार्थिनींना विषारी सापाने दंश केला. जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना नेमकी कशी घडली, विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या ठिकाणी पुरेशा सुरक्षा उपाययोजना होत्या की नाही, तसेच शाळा व्यवस्थापनाने आवश्यक सुरक्षेचे नियम पाळले होते का, याची सखोल चौकशी केली जाईल.



**वरुड** : विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबददल गिरीश गांधी यांचा शाल व पुष्पगुच्छ देवुन सत्कार करताना डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखडे, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष अशोक देवते, नगरसेवक योगेश्वर खासबागे, न.प.माजी उपाध्यक्ष हरिष कानुगो, नगरसेविका सिमा कानुगो.

# रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र शेटीये यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)










**वरुड** – सामाजिक बांधिलकी जपत आणि 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्था यांच्या वतीने संस्थाध्यक्ष जितेंद्र शेटीये यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले.

वरूड ब्लड बँकच्या चमूने रक्त संकलन करण्याचे कार्य केले. अपघातग्रस्त, गंभीर शस्त्रक्रिया, प्रसूतीदरम्यान रक्तस्राव झालेल्या महिला तसेच थॅलेसेमिया, कर्करोग आणि ॲनिमियासारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने आवश्यकता असते. अशा वेळी रक्तदात्यांनी दिलेले रक्त अनेक रुग्णांसाठी जीवनदायी ठरते. मागील अनेक वर्षापासून रक्तसेवक जितेंद्र शेटीये हे रक्तदानाच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून त्यांचा वाढदिवस रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्था वरुडच्या सर्व पादाधिकारी, सदस्यगण, मित्रपरिवार यांनी समाजाला 'रक्तदान हेच जीवनदान'चा संदेश दिला. या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उत्कृष्ट प्रतिसाद देत आपल्या रक्तदान केल्यामुळे कोणाचे तरी प्राण वाचू शकते, ही भावना ठेऊन रक्तदान केले आणि जितेंद्र शेटीये यांना रक्तदान करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या रक्तदान शिबिरासाठी ऑरेंजसिटी थॅलेसेमिया निर्मूलन समिती, युवा व्यापारी संघ, स्व.गणपतराव आंडे सेवा प्रतिष्ठान, श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्था, श्री सती माता दुर्गा मंदिर संस्थान, निमा संघटना, स्व.रामस्वरुपजी शेटीये बहुउद्देशीय संस्था, कलाजीवन चिकित्सालय, उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्था, गोपालकृष्ण गोरक्षण संस्था, श्रद्धा शिक्षण केंद्र, ब्राह्मण बहुउद्देशीय संस्था, माहेश्वरी पंचायत, कलाजीवन बहुउद्देशीय संस्था, खंडेलवाल सेवा समिती, सायकल स्वार बहुउद्देशिय संस्था, हरिसेवा संस्था फाऊंडेशन, पहाट पक्षी मित्र मंडळ, जायंटस ग्रुप ऑफ वरुड, पहाट पक्षी मित्र मंडळ आणि क्रांतीज्योती ब्रिगेड तालुका यांच्यासह अनेक सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभले आहे. समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखुन जास्तीत जास्त युवक, नागरिक आणि नियमित रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे असे मनोगत रक्तवीर सामाजिक बहुउद्देशीय संस्थाचे अध्यक्ष जितेंद्र शेटीये यांनी व्यक्त करीत वाढदिवस अविस्मरणीय केल्याबद्दल सर्व रक्तदाते, सहयोगी संस्था, मित्रपरिवारांचे आभार मानले.




याप्रसंगी मार्गदर्शक सुधाकर यावले, प्रमोद गणोरकर, डॉ.मनोहर आंडे यांच्यासह डॉ.प्रवीण ठाकरे, डॉ.आनंद झामडे, डॉ.भुषण खेरेडे, डॉ.ज्ञानदा खेरडे, देवेंद्र बोडखे, महेश बोरकुटे, अक्षय वैद्य, भुषण वानखडे, प्रकाश पोकळे, दीपक निंबाळकर, अजय राठोड, बिपीन पटेल, बाबलेश गडलिंग, जयदीप दाढे, मंगेश खैरकर, शिवराज सुगावे, चित्रकार युवराज ठाकरे, धर्मेंद्र दवे, सारंग व्यास, नितीन अगदकर, सोनल अग्रवाल, निरंजना तडस, स्वाती पडोळे, रवींद्र शेटीये, लता शेटीये, प्रवीण काळे, कृणाल पाटणे, कुमोद सिनकर, मनोज महादगडे, प्रमोद चव्हाण, सिद्धेश पारडसिंगे, मुकेश धुर्वे, धीरज अनव्हाने, आकाश उघडे, देवेंद्र ढोकणे, हबीब खालील, विशाल खेरडे, संजय हेडाऊ, मोहन माथुरकर, नितीन सिंगरवाडे, निलेश कुबडे, सतीश रेवतकर, सुनील कडू, माही पटेल, प्रशांत आंडे, मनोहर यावले, निखील महल्ले, सारंग गणोरकर, विजय बरडे, केतकी लेकुरवाळे, खुशाल खुरसंगे, प्रशांत शिंगरवाडे, पवन उपाध्याय, विवेक सुपले, गणेश हेटे, नरेंद्र गोमकाळे, दिनेश घ्यार, विशाल तडस, रवींद्र तडखंडे, नंदकिशोर कनेरकर, पंकज अनासाने, आनंद सुगावे, आनंद वर्मा तसेच अनेक मान्यवर व रक्तदाते उपस्थित होते.


कार्यक्रमाचे यशस्वितेकारीता रक्तवीर सामाजिक बहुउद्देशिय संस्थेचे सचिव कैलाश उपाध्याय, उपाध्यक्ष सहसचिव महेश बिलगये, कोषाध्यक्ष पंकज लेकुरवाळे, सदस्य डॉ.अरविंद बडघरे, लंकेश्वर उमक, तुषार खेरडे, कपिंद्र शेटीये, शैलेश धोटे, सोनू राजपूत, पूनम शेटीये, उन्नती राठोड यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

**नेहमी सत्याच्या वाटेने चाला, तिथे गर्दी कमी असेल पण प्रवास सुखकर असेल.**

## सोनं-चांदीच्या दरांची झेप : सामान्यांच्या स्वप्नांवर महागाईचा घाव

सोनं आणि चांदी ही भारतीय समाजाच्या भावविश्वाशी जोडलेली मौल्यवान धातू आहेत. मात्र वाढत्या किमतींमुळे आज हीच मौल्यवान संपत्ती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याचे चित्र आहे. भारतीयांच्या जीवनात सोन्या-चांदीला केवळ आर्थिक मूल्य नाही, तर भावनिक आणि सांस्कृतिक महत्त्वही आहे. लग्नसमारंभ असो, सण-उत्सव असो किंवा एखादा शुभप्रसंग, सोन्याचे दागिने आणि चांदीच्या वस्तूंना विशेष स्थान आहे. ग्रामीण भागात तर सोन्याला सुरक्षित गुंतवणूक आणि आर्थिक आधार मानले जाते. त्यामुळे सोन्याच्या दरातील प्रत्येक चढ-उताराचा परिणाम थेट सामान्य कुटुंबाच्या अर्थकारणावर होत असतो. गेल्या काही काळात सोन्या-चांदीच्या दरांनी घेतलेली झेप ही त्यामुळेच चिंतेचा विषय ठरत आहे. सोन्याच्या दरात वाढ होण्यामागे अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कारणे आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता, महागाई, विविध देशांतील आर्थिक धोरणे, व्याजदरातील बदल, डॉलरच्या तुलनेत रुपयाची स्थिती, भू-राजकीय तणाव आणि गुंतवणूकदारांचा सुरक्षित गुंतवणुकीकडे वाढता कल यांचा परिणाम मौल्यवान धातूंच्या किमतीवर होतो. जगभरातील बाजारपेठांमध्ये अस्थिरता वाढली की गुंतवणूकदार सोन्याकडे सुरक्षित पर्याय म्हणून पाहतात. परिणामी मागणी वाढते आणि दरही वर जातात. चांदीच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. चांदीचा वापर दागिन्यांबरोबरच इलेक्ट्रॉनिक्स, सौरऊर्जा, औद्योगिक उत्पादन आणि विविध तंत्रज्ञान क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे औद्योगिक मागणी वाढली की चांदीच्या किमतीवर त्याचा परिणाम होतो. भविष्यात हरित ऊर्जा आणि तंत्रज्ञानाचा विस्तार वाढत गेल्यास चांदीची मागणी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जाते. मात्र या वाढत्या दरांचा सर्वाधिक फटका बसतो तो सामान्य नागरिकांना. पूर्वी महिन्याच्या उत्पन्नातून थोडी-थोडी बचत करून मुलीच्या लग्नासाठी किंवा कुटुंबातील एखाद्या शुभकार्याकरिता सोनं घेण्याचे नियोजन केले जात होते. आज मात्र सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे त्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करावी लागत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सोनं खरेदी करणे हा आता पूर्वीपेक्षा अधिक मोठा आर्थिक निर्णय बनला आहे. विशेषतः मुलीच्या लग्नाच्या वेळी पालकांवर मोठा आर्थिक दबाव निर्माण होतो. सोन्याचे दागिने देणे ही अनेक कुटुंबांमध्ये सामाजिक परंपरा आहे. परंतु सोन्याचे दर वाढल्यामुळे लग्नाचा खर्च आणखी वाढतो. परिणामी काही कुटुंबांना कर्ज घ्यावे लागते किंवा इतर खर्चांमध्ये कपात करावी लागते. सामाजिक प्रतिष्ठेच्या अपेक्षा आणि आर्थिक वास्तव यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होताना दिसतो. ग्रामीण भागातील शेतकरी आणि छोटे व्यावसायिक यांच्यासाठी सोन्याला वेगळे महत्त्व आहे. अचानक आर्थिक अडचण निर्माण झाल्यास सोनं गहाण ठेवून कर्ज घेण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर आहे.




# पोस्ट थांबवली, प्रश्न सुरू झाले : सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या पारदर्शकतेची गरज

दिल्लीतील आंदोलनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधल्याची पोस्ट सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'मेटा'कडून काही काळ दाखवणे थांबवण्यात आल्याची घटना चर्चेत आली. एखादी पोस्ट काही काळ वापरकर्त्यांना दिसू न देणे हा तांत्रिक किंवा धोरणात्मक निर्णय असू शकतो; मात्र जेव्हा संबंधित पोस्ट एखाद्या प्रमुख राजकीय व्यक्तीशी आणि सार्वजनिक घडामोडीशी संबंधित असते, तेव्हा त्यातून अनेक व्यापक प्रश्न निर्माण होतात. सोशल मीडिया कंपन्यांचे नियम नेमके काय आहेत? कोणत्या कारणामुळे एखादी पोस्ट रोखली जाते? निर्णय घेण्याची प्रक्रिया किती पारदर्शक आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, डिजिटल युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण कोण करणार?



आज सोशल मीडिया हा केवळ मनोरंजनाचा माध्यम राहिलेला नाही. राजकीय पक्ष, सरकारे, सामाजिक संघटना, विद्यार्थी, पत्रकार आणि सामान्य नागरिक आपले विचार मांडण्यासाठी फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स आणि इतर प्लॅटफॉर्मचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे एखाद्या पोस्टची पोहोच थांबणे किंवा कमी होणे ही केवळ तांत्रिक बाब राहत नाही. त्याचा थेट संबंध सार्वजनिक चर्चेशी जोडला जातो.

मेटासारख्या जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांकडे कोट्यवधी वापरकर्त्यांचा डेटा आणि त्यांच्या माहितीपर्यंत पोहोच असते. या प्लॅटफॉर्मवर दररोज प्रचंड प्रमाणात मजकूर, छायाचित्रे आणि व्हिडिओ प्रसारित होतात. त्यातील काही सामग्री नियमांचे उल्लंघन करणारी असू शकते. हिंसाचाराला प्रोत्साहन देणारी, फसवणूक करणारी, द्वेष पसरवणारी किंवा चुकीची माहिती देणारी सामग्री रोखण्याची आवश्यकता असते. त्यामुळे प्लॅटफॉर्मकडे काही प्रकारचे नियंत्रण असणे अपरिहार्य आहे.

परंतु नियंत्रण आणि सेन्सॉरशिप यांच्यातील सीमारेषा स्पष्ट असणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी पोस्ट नियमांचे उल्लंघन करत असेल तर ती का हटवण्यात आली किंवा का मर्यादित करण्यात आली, याचे स्पष्ट कारण संबंधित वापरकर्त्याला मिळाले पाहिजे. विशेषतः सार्वजनिक व्यक्ती, सरकार किंवा महत्त्वाच्या सामाजिक विषयांशी संबंधित सामग्री असेल, तर निर्णय प्रक्रियेबाबत अधिक पारदर्शकता अपेक्षित आहे.

या घटनेच्या निमित्ताने 'प्लॅटफॉर्मची सत्ता' हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. पूर्वी प्रसारमाध्यमांमध्ये संपादक आणि वृत्तसंस्थांची भूमिका महत्त्वाची होती. आज सोशल मीडिया प्लॅटफॉर्मदेखील सार्वजनिक चर्चेच्या प्रवाहावर मोठा प्रभाव टाकतात. कोणती पोस्ट किती लोकांपर्यंत पोहोचेल, कोणती सामग्री वापरकर्त्यांना सुचवली जाईल आणि कोणती सामग्री मर्यादित केली जाईल, यामध्ये अल्गोरिदमची भूमिका असते.

अल्गोरिदम ही एक तांत्रिक व्यवस्था असली तरी त्याचे परिणाम सामाजिक आणि राजकीय असू शकतात. एखाद्या पोस्टची पोहोच अचानक कमी झाली, तर त्यामागे तांत्रिक त्रुटी आहे की धोरणात्मक निर्णय, हे सामान्य वापरकर्त्याला समजणे कठीण असते. म्हणूनच सोशल मीडिया कंपन्यांनी त्यांच्या निर्णयप्रक्रियेबाबत अधिक स्पष्ट माहिती देणे गरजेचे आहे.

या घटनेकडे केवळ एका राजकीय नेत्याच्या पोस्टपुरते मर्यादित करून पाहणेही योग्य ठरणार नाही. उद्या एखाद्या विरोधी पक्षाच्या नेत्याची पोस्ट, सामाजिक कार्यकर्त्याचा संदेश, विद्यार्थ्यांचा आंदोलनाशी संबंधित व्हिडिओ किंवा पत्रकाराची महत्त्वाची माहिती काही कारणाने रोखली गेली, तर त्याच प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. नियम सर्वांसाठी समान असणे ही डिजिटल लोकशाहीची मूलभूत अट आहे.

लोकशाहीमध्ये मतभिन्नता असते आणि ती असायलाच हवी. सरकारच्या बाजूने बोलणाऱ्यांनाही व्यासपीठ मिळाले पाहिजे आणि सरकारवर टीका करणाऱ्यांनाही आपले मत मांडण्याचा अधिकार असला पाहिजे. सोशल मीडिया कंपन्यांनी कोणत्याही राजकीय विचारसरणीच्या बाजूने झुकल्याची भावना निर्माण होणार नाही, यासाठी निष्पक्षता आणि पारदर्शकता राखणे महत्त्वाचे आहे.

त्याच वेळी सोशल मीडिया वापरणाऱ्या नागरिकांची जबाबदारीही कमी नाही. एखादी पोस्ट काही काळ दिसली नाही किंवा हटवली गेली, एवढ्यावरून लगेच 'अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला' किंवा 'राजकीय सेन्सॉरशिप' असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. त्यामागे तांत्रिक बिघाड, स्वयंचलित प्रणालीतील चूक, धोरणाची अंमलबजावणी किंवा अन्य कारण असू शकते. त्यामुळे कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे.

विशेषतः राजकीय विषयांवरील माहितीच्या बाबतीत सावधगिरी अधिक महत्त्वाची ठरते. सोशल मीडियावर एखाद्या घटनेचा छोटा व्हिडिओ किंवा स्क्रीनशॉट मोठ्या दाव्यासह प्रसारित केला जातो. त्यातील संदर्भ बदलला जाऊ शकतो. त्यामुळे मूळ पोस्ट, अधिकृत निवेदन आणि विश्वसनीय वृत्तस्रोत तपासणे ही नागरिकांची जबाबदारी आहे.

सरकारची भूमिकाही या संदर्भात महत्त्वाची आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मकडून पारदर्शकता मागताना सरकारनेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य, नागरिकांचे अधिकार आणि कायदेशीर प्रक्रिया यांचा समतोल राखला पाहिजे. सोशल मीडिया कंपन्यांवर नियंत्रण आवश्यक असले तरी ते नियंत्रण मनमानी पद्धतीने वापरले जाऊ नये. नियम स्पष्ट, न्याय्य आणि सर्वांसाठी समान असणे आवश्यक आहे.

आज भारतात डिजिटल माध्यमांचा विस्तार वेगाने होत आहे. मोबाईल इंटरनेटमुळे गावातील सामान्य नागरिकापासून ते देशाच्या राजधानीतील राजकीय नेत्यापर्यंत प्रत्येकाला आपला संदेश थेट जनतेपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली आहे. हे लोकशाहीसाठी मोठे परिवर्तन आहे. मात्र या स्वातंत्र्यासोबत चुकीची माहिती, बनावट खाते, दिशाभूल करणारे व्हिडिओ आणि डिजिटल हस्तक्षेप यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत.

म्हणूनच भविष्यात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या कार्यपद्धतीबाबत अधिक पारदर्शक नियमांची आवश्यकता आहे. एखादी पोस्ट का रोखली, किती काळासाठी रोखली, कोणत्या नियमाचा आधार घेतला आणि वापरकर्त्याला अपील करण्याची संधी आहे का, याची माहिती स्पष्टपणे मिळाली पाहिजे. विशेषतः राजकीय आणि सार्वजनिक हिताच्या विषयांवर निर्णय घेताना स्वतंत्र पुनरावलोकनाची व्यवस्था असणेही उपयुक्त ठरू शकते.

मेटाच्या या कथित कृतीमुळे निर्माण झालेली चर्चा एका पोस्टपुरती मर्यादित राहू नये. ती डिजिटल लोकशाहीच्या भवितव्यावर व्यापक चर्चा घडवून आणणारी ठरली पाहिजे. तंत्रज्ञान कंपन्यांकडे मोठी ताकद आली आहे. या ताकदीसोबत मोठी जबाबदारीही आली आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनीही डिजिटल माध्यमांचा वापर अधिक जबाबदारीने करणे आवश्यक आहे. लोकशाहीचा खरा अर्थ केवळ निवडणुकीत मतदान करण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रत्येक नागरिकाला माहिती मिळणे, मत मांडणे आणि विविध विचार ऐकण्याची संधी मिळणे हा त्याचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे एखादी पोस्ट थांबवली गेली की नाही, यापेक्षा ती का थांबवली गेली, याचे उत्तर पारदर्शकपणे मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.

डिजिटल युगात सोशल मीडिया हे लोकशाहीचे नवे सार्वजनिक व्यासपीठ बनले आहे. या व्यासपीठावर नियम हवेत; पण नियमांबरोबर पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्वही हवे. सरकार असो, राजकीय पक्ष असो किंवा तंत्रज्ञान कंपनीङ्कसार्वजनिक संवादावर प्रभाव टाकणाऱ्या प्रत्येक संस्थेने नागरिकांच्या अधिकारांचा आदर केला पाहिजे.

पोस्ट काही काळ दिसली नाही म्हणून प्रश्न संपत नाहीत; उलट त्या निमित्ताने डिजिटल स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर अधिक गंभीर चर्चा सुरू होते. आणि हीच चर्चा मजबूत लोकशाहीसाठी आवश्यक आहे.

# पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको : पण उत्तरदायित्वही हवे!

लोकशाही व्यवस्थेत आंदोलनाला जितके महत्त्व आहे, तितकेच कायदा आणि सुव्यवस्थेलाही आहे. सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठवणे, अन्यायाविरोधात निदर्शने करणे आणि आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरणे हा नागरिकांचा लोकशाही अधिकार आहे. मात्र या अधिकारासोबत काही जबाबदाऱ्याही येतात. त्याचप्रमाणे कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांवरही अधिकारांसोबत संयम, संवेदनशीलता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा असते. त्यामुळे आंदोलन आणि पोलिस यांच्यात संघर्ष निर्माण झाला की कोण एकटाच दोषी आणि कोण एकटाच निर्दोष, असा सरसकट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.



दिल्लीतील जंतर-मंतर परिसरातील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बळाचा वापर केल्याच्या आरोपांमुळे पुन्हा एकदा हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आंदोलनकर्त्यांची बाजू काय आहे, पोलिसांची भूमिका काय होती, परिस्थिती किती नियंत्रणाबाहेर गेली आणि पोलिसांनी वापरलेले बळ आवश्यक व प्रमाणबद्ध होते का, या सर्व प्रश्नांची निष्पक्षपणे चौकशी होणे गरजेचे आहे. मात्र या प्रक्रियेत संपूर्ण पोलिस दलालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हे निश्चितच योग्य नाही.

पोलिस हे लोकशाही व्यवस्थेचे शत्रू नाहीत. उलट नागरिकांचे संरक्षण, वाहतूक व्यवस्था, गुन्हेगारीवर नियंत्रण, आपत्कालीन परिस्थिती हाताळणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे यासाठी पोलीस दिवस-रात्र काम करतात. आंदोलनाच्या वेळीही त्यांच्यावर मोठी जबाबदारी असते. हजारो लोकांचा जमाव, भावनिक वातावरण, घोषणाबाजी, वाहतूक कोंडी आणि संभाव्य हिंसाचार यामध्ये पोलिसांना काही क्षणांत निर्णय घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत प्रत्येक निर्णय परिपूर्ण असेलच असे नाही; पण प्रत्येक पोलिसाला दडपशाही करणारा म्हणून पाहणेही अन्यायकारक आहे. दुसरीकडे, 'कायदा-सुव्यवस्था राखण्याचे कर्तव्य' या नावाखाली पोलिसांना अमर्याद अधिकार मिळू शकत नाहीत. नागरिकांना आंदोलनाचा अधिकार आहे आणि त्या अधिकाराचा आदर करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधणे, त्यांना योग्य जागा उपलब्ध करून देणे, वाहतूक व सार्वजनिक सुरक्षेची व्यवस्था करणे आणि परिस्थिती बिघडण्यापूर्वी मध्यस्थी करणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आंदोलन हिंसक झाले तर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होते. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, पोलिसांवर हल्ला, सामान्य नागरिकांना धोका किंवा महत्त्वाच्या संस्थांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्यास प्रशासनाला कारवाई करावीच लागते. अन्यथा कायद्याचा धाकच संपेल. परंतु कारवाई करतानाही 'किमान आवश्यक बळ' हा तत्त्वतः महत्त्वाचा निकष असला पाहिजे. जमाव नियंत्रणात आणणे हा उद्देश असावा; नागरिकांना शिक्षा देणे हा नव्हे.

आज सोशल मीडिया आणि २४ तासांच्या वृत्तवाहिन्यांमुळे एखाद्या घटनेचे काही सेकंदांचे चित्रण देशभरात पोहोचते. एका व्हिडीओच्या आधारे संपूर्ण घटनेचा निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ती वाढली आहे. परंतु काही सेकंदांचा व्हिडीओ संपूर्ण पार्श्वभूमी सांगत नाही. आंदोलन सुरू होण्यापूर्वी काय घडले, पोलिसांनी कोणत्या सूचना दिल्या, जमावाने त्या पाळल्या का, कोणत्या परिस्थितीत बळाचा वापर झाला आणि त्यानंतर काय झाले, हे सर्व तपासणे आवश्यक आहे.

म्हणूनच अशा घटनांमध्ये स्वतंत्र चौकशी अत्यंत महत्त्वाची ठरते. पोलिसांनी चुकीचे केले असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. तसेच आंदोलनकर्त्यांकडून कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर त्यांच्यावरही कायदेशीर प्रक्रिया झाली पाहिजे. लोकशाहीत कायदा हा व्यक्ती, पद, विचारसरणी किंवा संघटना पाहून बदलता कामा नये.

पोलिसांच्या मनोधैर्याचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. सतत टीका, राजकीय दबाव, अपुऱ्या मनुष्यबळात काम, दीर्घ ड्युटी आणि धोकादायक परिस्थिती यामुळे पोलिसांवर मानसिक ताण असतो. एखाद्या घटनेतील काही पोलिसांच्या चुकीमुळे संपूर्ण दलाला दोषी ठरवले तर प्रामाणिकपणे काम करणाऱ्या हजारो पोलिसांचे मनोबल खच्ची होऊ शकते. कायदा अंमलात आणणाऱ्या यंत्रणेचा आत्मविश्वास टिकवणे हीदेखील लोकशाहीची गरज आहे. मात्र 'पोलिसांचे मनोधैर्य' हा शब्द गैरवर्तनावर पडदा टाकण्यासाठी वापरला जाऊ नये. पोलिस दलाचा सन्मान राखणे आणि पोलिसांना उत्तरदायी ठेवणे या दोन गोष्टी परस्परविरोधी नाहीत. उलट जबाबदार, पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत काम करणारे पोलीस दलच जनतेचा खरा विश्वास संपादन करू शकते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# जुन्या इमारतींसाठी 'स्ट्रक्चरल फिटनेस', पर्जन्यजल संकलन अनिवार्य : सरकारचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील जुन्या इमारतींना नवीन पाणी किंवा ड्रेनेज (सांडपाणी) जोडणी हवी असल्यास, आता वैध 'स्ट्रक्चरल स्टेबिलिटी सर्टिफिकेट' (रचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र) आणि बांधकाम परवानगी सादर करणे बंधनकारक असेल. यासोबतच इमारतींमध्ये पर्जन्यजल संकलन (रेनवॉटर हार्वेस्टिंग) आणि बायो-स्लज (जैव-गाळ) व्यवस्थापनाची सोय करणे आवश्यक असणार आहे. सोमवारी जारी करण्यात आलेल्या एका शासन निर्णयाद्वारे ही माहिती देण्यात आली. नगरविकास विभागाने जारी केलेल्या या नव्या निर्देशानुसार, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींमधील जुन्या इमारतींना नवीन पाणी, ड्रेनेज किंवा इतर सेवांची जोडणी देताना या पर्यावरणीय अटींची पूर्तता करणे ही मुख्य अट असेल.

## महिला विकास मंच व नीमा विमेन्स फोरमच्या वतीने

# 'पौगंडावस्थेतील समस्यांचे निराकरण' विषयावर मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे महिला विकास मंच व नीमा विमेन्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका टी.सी.सायर होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ.मिना बंदे यांनी विद्यार्थिनींना पौगंडावस्थेतील शारीरिक, मानसिक व भावनिक बदल, आरोग्य व स्वच्छता, योग्य आहार, मानसिक स्वास्थ्य, आत्मविश्वास तसेच मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता याबाबत सविस्तर व शास्त्रीय मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक अशोक चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली तसेच मंदा फोकमारे, सुप्रिया बंदे व ज्येष्ठ शिक्षिका मेघाविनी बडे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगला कुकडे यांनी केले. डॉ.मिना बंदे यांनी विद्यार्थिनींनी पौगंडावस्थेतील बदलांकडे भीती किंवा संकोचाने न पाहता सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन केले. या प्रसंगी विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून मासिक पाळीतील स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक व शास्त्रीय पद्धतीने उत्तरे देत शंकांचे निरसन केले. त्यामुळे विद्यार्थिनींच्या मनातील अनेक गैरसमज दूर होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. अध्यक्षीय मार्गदर्शनातून टी.सी.सायर यांनी विद्यार्थिनींना आपल्या आरोग्याची काळजी घेत शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासालाही महत्त्व द्यावे, असा संदेश देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार शिक्षिका नंदिनी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागपूरच्या ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या सदस्यांनी

# स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला केले अभिवादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस** – येथील नागपूरच्या ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या सदस्यांनी चांदस-वाठोडा येथील ऐतिहासिक शहीद स्मारकाला भेट देऊन स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला विनम्र अभिवादन केले.



चांदस शिवमंदिराचे अध्यक्ष लक्ष्मीकांत चोबितकर यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर शहीद स्मारकावर पुष्पहार अर्पण करुन स्वातंत्र्यविरांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी ज्ञानेंद्र देशमुख यांनी १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चांदस-वाठोडा गावातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाचा इतिहास प्रभावीपणे उलगडून सांगितला. त्यांच्या मार्गदर्शनातून उपस्थितांना स्वातंत्र्यलढ्याचा प्रेरणादायी वारसा तसेच शहीदांच्या बलिदानाचे महत्त्व समजले. शहीदांच्या स्मृती जतन करणे आणि देशभक्तीच्या मूल्यांचा पुढील पिढीपर्यंत प्रसार करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. शहीद स्मारक परिसराचे पर्यावरण संवर्धन करण्याच्या उद्देशाने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

शेवटी ग्रामस्थ नरेंद्र गायकी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या भेटीत अ.भा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती राष्ट्रीय महासचिव हरीश देशमुख, गजानन महाले, महादेव बोराडे, पद्माकर बाविस्कार, मोरेश्वर मेंघरे, सुरेश धामणकर, अरविंद गुंटेवार, रमेश खंडेतोड, रामभाऊ खंडेतोड, विठ्ठल कनाठे, पांडुरंग बोबडे तसेच ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## राष्ट्रीय दिव्यांग पार्टीच्या

# जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र घाटोळे तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर शहाणे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – दिव्यांग, वृद्ध, युवा वर्ग, विधवा तसेच किन्नर समाजाच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या राष्ट्रीय दिव्यांग पार्टीने जिल्ह्यात संघटनात्मक विस्ताराला सुरुवात केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष वीरेंद्र कुमार यांनी टेंभुरखेडा येथील राजेंद्र घाटोळे यांची जिल्हाध्यक्षपदी तर पत्रकार सोमेश्वर शहाणे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.





राजेंद्र घाटोळे हे तालुक्यातील टेंभुरखेडा येथील रहिवाशी असून ते गेल्या अनेक वर्षांपासून दिव्यांग, वृद्ध, विधवा तसेच निराधार नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने काम करीत आहेत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा, त्यांना न्याय व हक्क मिळावा, यासाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय दिव्यांग पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष वीरेंद्र कुमार यांनी त्यांचेवर जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारी सोपविली आहे तर पत्रकार सोमेश्वर शहाणे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या दोन्ही नियुक्त्यांमुळे जिल्ह्यात राष्ट्रीय दिव्यांग पार्टीचे संघटन अधिक मजबुत होऊन दिव्यांग, वृद्ध, विधवा, निराधार, युवा आणि किन्नर समाजाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अधिक प्रभावीपणे कार्य केले जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# नाशिकमध्ये पुन्हा पर्यटकांवर हल्ला : गाडीचा पाठलाग करत तोडफफोड

## १० जणांविरोधात गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नाशिक** – नाशिकच्या हरिहर किल्ल्यावरून परतणाऱ्या पर्यटकांच्या वाहनाला अडवून मारहाण आणि दगडफेक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पर्यटन मार्गावर पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हरिहर किल्ल्यावरून परतणाऱ्या पर्यटकांच्या वाहनाला अडवून मारहाण आणि दगडफेक केल्याची धक्कादायक घटना पुढे आली आहे. त्र्यंबकेश्वर-घोटी मार्गावरील बोरीची वाडी परिसरात हा प्रकार घडल्याची माहिती आहे. मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर पर्यटकांच्या वाहनाचा पाठलाग केल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यानंतर वावी हर्ष परिसरात गाडी अडवून चालक आणि प्रवाशांना काठी तसेच मारहाण करण्यात आल्याची फिर्याद आहे.

या प्रकरणी १० जणांविरुद्ध घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार, पर्यटक हरिहर किल्ल्यावरून वाहनाने परतत असताना मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर संबंधितांनी मोटारसायकलवरून पर्यटकांच्या गाडीचा पाठलाग केल्याचा आरोप आहे.

# महामार्गावरचे अनधिकृत धाबे होणार भुईसपाट

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार दोन महिन्यांत कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राष्ट्रीय महामार्गांच्या लगत असलेले अनधिकृत ढाबे, उपाहारगृह, व्यावसायिक, वाणिज्यिक बांधकामे पुढील दोन महिन्यांत भुईसपाट केली जाणार आहेत.




याशिवाय राष्ट्रीय महामार्गावर नव्याने ढाबे, खानावळ, हॉटेल अथवा अन्य व्यावसायिक बांधकाम उभारण्यास बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे बेकायदा हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत. राष्ट्रीय महामार्गांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २०२६ रोजी महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना आदेश दिले होते. त्यानुसार नगरविकास विभागाने सोमवारी याबाबत शासन परिपत्रक जारी करून महामार्गावर उभारण्यात आलेले बेकायदा ढाबे, खानावळी, हॉटेल्स, दुकाने तसेच अन्य बांधकामे पुढील ६० दिवसांत हटविण्याचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. यापुढे महामार्गाच्या सुरक्षा क्षेत्रात कोणतेही परवाने, ना हरकत प्रमाणपत्र किंवा व्यापार परवानगी देण्यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## निःशुल्क राज्यस्तरीय

# श्रीमद भगवतगीता ज्ञानस्पर्धा परीक्षा उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – अ.भा.महानुभाव परिषद श्रीक्षेत्र जाळीचा देव( बुलढाणा) अंतर्गत संस्थापक अध्यक्ष प.पू.प. महंत आचार्य प्रवर लोणारकर यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने परीक्षा प्रमुख प.पू.प.महंत श्री पाथ्रीकरबाबा बुलढाणा यांचे मार्गदर्शनात निःशुल्क राज्यस्तरीय श्रीमद भगवत गीता ज्ञान स्पर्धा परीक्षा नुकतीच संपूर्ण राज्यासह वरुड व मोर्शी तालुक्यात परमसेवक सदभक्त विनय चौधरी यांचे नेतृत्वात अतिशय उत्साहात संपन्न झाली.



या परीक्षेला वरुड तालुक्यामधून ४८७ परीक्षार्थी बसले होते मोर्शी तालुक्यांमध्ये परम सेवक सदभक्त रजनी सुरेशराव मडघे यांचे नेतृत्वात १३५ परीक्षार्थ्यांनी परीक्षा दिली.

ही परीक्षा घेणे मागील मुख्य उद्देश घराघरांमध्ये अत्यंत सोप्या भाषेत असलेली गीतापुस्तिका पोहोचवून ती प्रत्येकाच्या वाचनात यावी व गीता प्रसार व्हावा संपूर्ण राज्यामध्ये एकाच दिवशी परीक्षा घेतली जात असून हा उपक्रम गेल्या २०-२२ वर्षांपासुन सुरु आहे. श्री चक्रधर स्वामी अवतार दिनी परीक्षेचा निकाल जाहीर होऊन प्रथम ३ येणाऱ्यांना जिल्हास्तरीय प्रत्येकी २ हजार ५०० रुपये, १ हजार ५०० रुपये व १ हजार १०० रुपये बक्षीस दिली जातात. उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण राज्यात प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येते. तालुक्यामध्ये अग्रगण्य सामाजिक संस्था क्रांतीज्योती ब्रिगेड म.रा.चे माध्यमातून संस्थापक अध्यक्ष ॲड.नंदेश अंबाडकर यांचे तर्फे उत्तीर्ण पहिले तीन विद्यार्थ्यांना मोमेंटो देऊन सन्मान करण्यात येतो. वरुड तालुक्यामध्ये ही परीक्षा ११ केंद्रावर तर मोर्शीमध्ये चार केंद्रावर घेण्यात आली.

परीक्षेच्या यशस्वितेकरिता परम पूज्य सद्गुणबाबा, बाबा तपस्विनी, मालन आई, उज्वल डहाके मुख्याध्यापक श्याम गावंडे, अशोक भेले, विलास खसारे, प्राचार्य योगेश बरडिया, प्रविण गणोरकर, मुख्याध्यापक भुपेंद्र पोहरकर, किशोर खवले, कुबडे, वाघमारे, मुख्याध्यापक नितीन ठाकरे, देशमुख, प्राचार्य नीता चिमोटे, मुख्याध्यापक देशमुख तसेच चक्रधर मंडळातील सदभक्तांनी परिश्रम घेऊन परीक्षा यशस्वी पार पडली.

## वरुड येथील आठवडी बाजाराच्या जागेचा मार्ग झाला अखेर मोकळा

# आठवडी बाजार भू-संपादनाबाबत कलम ३०८ अंतर्गत दाखल अर्ज जिल्हाधिकाऱ्यांनी फेटाळला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील आठवडी बाजाराच्या जागेचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. आठवडी बाजाराच्या भू-संपादनासंदर्भात महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ३०८ अंतर्गत दाखल करण्यात आलेला अर्ज जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राथमिक टप्प्यातच फेटाळला आहे.

नगर परिषदेच्या विशेष सभेत आठवडी बाजारासाठी जागेला मंजुरी देण्यात आली होती. या निर्णयाविरोधात संबंधितांनी कलम ३०८ अंतर्गत अर्ज दाखल केला होता. मात्र, सदर प्रकरण कायद्यानुसार चालविण्यास अपात्र असल्याचे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी अर्ज नामंजूर केला.

१५ मे २०२६ रोजी झालेल्या विशेष सुनावणीमध्ये आठवडी बाजार विकसित करण्याचा ठराव व कलम ३०८ अंतर्गत दाखल अर्ज प्राथमिक टप्प्यातच फेटाळण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे संबंधित प्रकरणात हस्तक्षेप करण्यासाठी कायदेशीर आधार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आठवडी बाजार विकसित करण्यासाठी नगर परिषदेकडून यापूर्वीच निर्णय घेण्यात आला असून, या निर्णयाला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे वरुड शहरातील आठवडी बाजाराच्या जागेच्या विकासाचा मार्ग प्रशस्त झाला असून, बाजाराच्या विस्ताराबाबतची चर्चा पुन्हा सुरु झाली आहे.

प्रकरणातील ठळक मुद्दे आठवडी बाजार विकसित करण्यासाठी नगर परिषदेचा ठराव, कलम ३०८ अंतर्गत दाखल अर्जावर सुनावणी, जिल्हाधिकाऱ्यांकडून अर्ज प्राथमिक टप्प्यातच फेटाळला, बाजाराच्या जागेच्या विकासाचा मार्ग मोकळा, नगर परिषदेच्या निर्णयाला महत्त्वपूर्ण दिलासा.

मराठवाड्यात पाणी संकट

# पाणीसाठा अजूनही ४५ टक्क्यांखाली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**छत्रपती संभाजीनगर** – यंदा ‘एल-निनो’ प्रवाहामुळे देशात पाऊस कमी पडणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला होता.

आता राज्यातील अनेक भागात पावसाने हजेरी लावली तरीही मराठवाड्यात पाणी संकट उभे राहिले आहे. यंदाचा मान्सून संपायला अवघे ५० दिवस शिल्लक राहिले असतानाही, मराठवाडा विभागातील लघू आणि मध्यम सिंचन प्रकल्पांमधील पाणीसाठा अजूनही क्षमतेच्या ४५ टक्क्यांपेक्षा कमीच आहे, अशी माहिती एका अधिकृत अहवालातून समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली आणि धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या निम-शुष्क प्रदेशात विविध नद्यांवर ७६ मध्यम आणि ७७८ लघू सिंचन प्रकल्प बांधले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालानुसार, या ७६ मध्यम प्रकल्पांची एकूण पाणी साठवण क्षमता ९५८.४ दशलक्ष घनमीटर आहे.

# कुंभमेळ्याच्या कामांचे बनावट टेंडर : ५०० कोटींचा गंडा घातल्याचे उघड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## मंत्री महाजन यांच्याकडून कारवाईचे आदेश



***नाशिक*** – नाशिक येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विविध वस्तूंचा पुरवठा करण्याच्या नावाखाली ठेकेदारांना बनावट टेंडर देण्याचा उद्योग सुरू झाला असून यात ४०० ते ५०० कोटींचा गंडा घातला गेल्याचे कळते.

कुंभमेळ्याचे कोणतेही टेंडर हे ऑफलाइन दिले गेले नसतांना हे बनावट टेंडर ऑफलाइन दिले गेले असून यात चार जणांचा सहभाग असल्याचे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी सांगितले. या बाबतची बनावट वर्कऑर्डरच पत्रकारांना दाखवत या प्रकरणी पोलिसांना तक्रार देण्यात आल्याचे महाजन यांनी सांगितले. नाशिक येथे होत असलेल्या कुंभमेळ्याची युद्धपातळीवर तयारी सुरू असून कामाच्या वर्क ऑर्डर या ऑनलाइन पद्धतीने दिल्या जात आहेत. तरीही आगामी कुंभमेळ्यासाठी पोलिसांना विविध वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी तसेच अन्य वस्तू पुरवण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने टेंडर काढले तसेच नाशिक आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त सिंग यांच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांना दिली.

फसवणूक झालेल्या काही ठेकेदारांनी थेट ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन या बाबतची तक्रार केली. मंत्री गिरीश महाजन यांनी पोलीस आणि संबंधित प्रशासनाला या बाबत तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

# कुणबी प्रमाणपत्र रद्द केलेले नाही! बीड जिल्हा प्रशासनाचा खुलासा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेवरून बीड जिल्ह्यात कोणत्याही व्यक्तीचे कुणबी जातीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले नाही. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी या संदर्भात विविध वृत्तवाहिन्यांवर केलेले दावे पूर्णपणे तथ्यहीन आणि वस्तुस्थितीला धरून नाहीत, असा खुलासा बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केला आहे. याबाबत स्वामी यांनी महसूल मंत्र्यांच्या कार्यालयाला चौकशी अहवालात केला आहे. या अहवालात माजलगाव नगर परिषदेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेविका रेखा अंबुरे यांनी मौजे खळवट लिमगाव (ता.वडवणी) येथील कुणबी नोंद असलेला ‘नमुना-३३’ जिल्ह्याच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची विनंती प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून अर्जदारांचे प्रतिज्ञापत्र आणि शपथपत्र नोंदवून घेतले.

तक्रार अर्जावर चौकशीचे निर्देश दिले होते, रद्दचे नाही माजलगाव नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सुमन माणिकराव मुंडे यांनी महसूल मंत्र्यांकडे या प्रकरणी एक अर्ज सादर केला होता. महसूल मंत्र्यांनी या अर्जावर केवळ चौकशी करावी, अशा स्वरूपाचा शेरा देऊन तो अर्ज बीड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला होता. महसूल मंत्र्यांनी केवळ आलेल्या तक्रार अर्जावर चौकशीचे निर्देश दिले होते. प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले नव्हते, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नागपुरच्या विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेमध्ये

# नांदगावच्या नवचैतन्य बालभजन मंडळाला उत्तेजनार्थ पुरस्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – नागपुरच्या सक्करदरा परिसरातील श्री संताजी सभागृह येथे नुकत्याच पार पडलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनांवर आधारीत भव्य विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेमध्ये तालुक्यातील नांदगाव येथील नवचैतन्य बाल भजन मंडळाने उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त करुन नावलौकीक प्राप्त केला आहे.

केंद्रीय मंत्री तथा नागपुरचे खासदार नितीन गडकरी यांच्या संकल्पतेतून ५ ते ७ ऑगस्ट दरम्यान विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपुर्ण विदर्भातून शेकडो भजन मंडळांनी आपआपला सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये तालुक्यातील नांदगाव येथील नवचैतन्य बाल भजन मंडळाने सहभाग घेतला होता. त्यांच्या भजनाला उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त झाला असून केंद्रीय मंत्री तथा नागपुरचे खासदार नितीन गडकरी यांच्यासह अन्य मान्यवरांचे हस्ते नवचैतन्य बाल भजन मंडळाच्या युवकांचा गौरव करण्यात आला. नवचैतन्य बाल भजन मंडळामध्ये हार्मोनियम वादक गणपती बुरंगे, तबला वादक कृपाल रामेकर, गायनकर्ते, कार्तिक प्रफुल शहाणे आणि नयन गजानन दुधकवरे, साथसंगत साहिल पाचपोर, लावण्या घाटोळे, हर्षल काकडे, सुमित घाटोळे, स्वराज पाटणे, यश सोनारे, पवन भगत, हार्दिक राऊत व गुरुदेव सेवा मंडळ नांदगाव यांचा समावेश आहे. नवचैतन्य बाल भजन मंडळाला पुरस्कार मिळाल्याबद्दल सरपंच अजय चोरोडे यांचेसह ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामवासियांचे सर्वांचे कौतुक केले आहे.

# चार महिन्यांपूर्वीचा काँक्रिटीकरण झालेला रस्ता पुन्हा फोडला, नाशिक महापालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – शहरातील सीबीएस ते कॅनडा कॉर्नरदरम्यान अवघ्या चार महिन्यांपूर्वी काँक्रिटीकरण करण्यात आलेला रस्ता पुन्हा फोडण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. पायाभूत सुविधांसाठी पुन्हा रस्ते फोडावे लागणार नसल्याचा महापालिकेचा दावा अल्पावधीत फोल ठरला आहे. स्मार्ट सिटी कंपनीच्या कामासाठी हा रस्ता फोडला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नगरसेविका डॉ.हेमलता पाटील यांनी आक्षेप घेत काम थांबवले.

कुलकर्णी गार्डनजवळ रस्ता फोडण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळताच डॉ.पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी मजुरांकडे चौकशी केली असता, संबंधित काम हे फारूख नावाच्या ठेकेदारामार्फत सुरू असल्याचे सांगण्यात आले. स्मार्ट सिटी कंपनीच्या कामासाठी रस्त्यावर ढापे करण्याचे काम सुरू असल्याची माहितीही समोर आली. वारंवार रस्त्यांचे खोदकाम विशेष म्हणजे, या कामाच्या ठिकाणी महापालिका किंवा स्मार्ट सिटीचा कोणताही अभियंता उपस्थित नसल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे नवीन रस्ता तयार करण्यापूर्वी विविध युटिलिटींचे नियोजन नेमके का करण्यात आले नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध विकासकामे सुरू आहेत. त्यातच गॅस पाइपलाइन, जलवाहिनी आणि फायबर ऑप्टिकलसह इतर सुविधांसाठी वारंवार रस्ते खोदले जात असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.


## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-६२/२०२६ दि.१३/०१/२०२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शेख मोहिद शेख हफीज, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे शेख मोहिद शेख हफीज, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०१/०७/१९७२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायलयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०१/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार
वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९१/२०२६ ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रविण महादेव मांगुलकर, वय अं.४० वर्ष, धंदा-मजुरी
२) प्रमोदीनी प्रविण मांगुलकर, वय अं.३५ वर्ष, धंदा- घरकाम
३) आस्था प्रविण मांगुलकर, वय अं.९ वर्ष, धंदा- शिक्षण
(अर्जदार क्र.३ करीता अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.२ आई)
रा.वार्ड क्र.३, वाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत माही प्रविण मांगुलकर, रा.वाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४५/२०२६ ने.ता.०७/०९/२०२६**

**अर्जदार :-**

सुनिल गणपत मालोकार
वय अं.५८ वर्ष, धंदा-शेती
रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गणपत महादेव मालोकार, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२२/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) साहेबराव बाबुराव सोनारे, वय अं.५९ वर्ष, धंदा-शेती
२) सौ.देवीनी साहेबराव सोनारे, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम
३) मंगेश साहेबराव सोनारे, वय अं.३४ वर्ष, धंदा- शेती
४) आशिष साहेबराव सोनारे, वय अं.३२ वर्ष, धंदा- शेती
क्र.१ ते ४ रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रुपेश साहेबराव सोनारे, रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# कोलंबियाला भूकंपाचा भीषण धक्का! ७.४ रिश्टरचा शक्तिशाली भूकंप

**१३२ जणांचा मृत्यू, परिस्थिती गंभीर**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**बोगोटा** – कोलंबियाच्या पश्चिम भागाला सोमवारी शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. ७.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपात किमान १३२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत अनेक इमारती कोसळल्या असून, ढिगाऱ्याखाली नागरिक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. जखमींना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू असून, अनेक नागरिकांनी सुरक्षिततेसाठी घराबाहेर धाव घेतली.

अमेरिकेच्या भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू सॅन जोसे डेल पालमार येथे होता. चोको प्रांतातील सुमारे ४,८०० लोकसंख्या असलेल्या या भागापासून राजधानी बोगोटा सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे १०७ किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले. या भूकंपाचे धक्के शेजारील इक्काडोरमध्येही जाणवले.

**पेरेरामध्ये १८ जणांचा मृत्यू :** पेरेराचे महापौर मॉरिसिओ सालाझार यांनी काराकोल रेडिओला दिलेल्या माहितीनुसार, पेरेरा शहरातील १८ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांनी शहरातील परिस्थिती 'गंभीर' असल्याचे सांगितले. स्थानिक माध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओ आणि दृश्यांमध्ये पेरेरा, काली आणि क्विब्डो शहरांतील घरे तसेच छोट्या इमारती कोसळताना दिसत आहेत. मनिझालेस शहरातही भूकंपाचा मोठा परिणाम झाला. बोगोटापासून सुमारे ३०० किलोमीटर अंतरावर असलेल्या या शहरातील निआो-गॉथिक कॅथेड्रलच्या एका मनोऱ्याचा भाग कोसळला.

**कोलंबियात शक्तिशाली भूकंप दुमिळ :** कोलंबियाच्या मध्य आणि पश्चिम भागात छोटे भूकंप म्हणजेच 'टेम्ब्लोर्स' जाणवणे सामान्य आहे. मात्र, ६.० पेक्षा अधिक तीव्रतेचे भूकंप तुलनेने दुमिळ मानले जातात. यापूर्वी आर्मेनिया शहराजवळ ६.२ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. त्या भूकंपात १,१०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता.

## गारगाई पाणी प्रकल्पासाठी मेक्सिकोतील कंपनीची सल्लागार म्हणून निवड

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – महापालिकेच्यावतीने गारगाई पाणी प्रकल्प हाती घेण्यात येत असून या प्रकल्प कामाच्या प्रस्तावाला काही दिवसांपूर्वीच मान्यता दिल्यानंतर आता या कामावर देखरेख ठेवण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे. या कामासाठी मेक्सिकोतील धरणांचे काम पाहणाऱ्या आणि मेट्रो रेल्वेच्या काम पाहणाऱ्या कंपनीची निवड करण्यात येत आहे. या कामासाठी आयेसा इंडिया प्रा.लि. व चॉईस कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा.लि या कंपनीची निवड करण्यात आली असून यासाठी विविध करांसह २४ कोटी रुपये अदा करण्यात येणार आहे.

## ॲमेझॉन रिटेल इंडिया कालबाह्य अन्नसाठा नष्ट करणार

**एफडीएच्या देखरेखीखाली कारवाई करण्याचे न्यायालयाचे निर्देश**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**मुंबई** – ॲमेझॉन रिटेल इंडियाने आपला अन्न परवाना रद्द करण्याच्या निर्णयाला दिलेले आव्हान प्रलंबित असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी कंपनीला भिवंडी येथील गोदामात पडून असलेल्या कालबाह्य अन्न उत्पादनांची यादी तयार करून एफडीएच्या देखरेखीखाली तो नष्ट करण्याची परवानगी दिली आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, न्यायालय ॲमेझॉनच्या याचिकेवर गुणवत्तेच्या आधारे सुनावणी घेऊन पुढील आदेश देत नाही तोपर्यंत ही व्यवस्था कायम राहील.

## आधी काँग्रेस सोडली, आता शिंदेंची भेट

**अकोल्यातील बड्या नेत्याचा राजकीय निर्णय ठरला? १५ ऑगस्टला चित्र स्पष्ट होणार**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**अकोला** – अकोल्यात शिंदेंच्या शिवसेनेकडून मोठा राजकीय मासा गळाला लावण्याचे प्रयत्न सुरूयेत. २०२४ मध्ये काँग्रेसचे लोकसभेचे उमेदवार असलेल्या डॉ.अभय पाटील यांनी नुकतीच मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतलीय. दोघांच्या तासभराच्या भेटीत पुढच्या राजकीय निर्णयाबद्दल चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिलीये. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत डॉ.अभय पाटील हे तब्बल ४ लाख १६ हजार मते घेत दुसऱ्या स्थानावर राहिले होते. तर वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे तिसऱ्या क्रमांकावर होते.

दरम्यान, काँग्रेसच्या कार्यपद्धतीला कंटाळून वर्षभरापूर्वी डॉ.पाटील यांनी पक्षाचा राजीनामा दिला होताय. त्यानंतर त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षामध्ये प्रवेश केलेला नव्हता. यासोबतच त्यांनी काँग्रेसच्या केंद्रीय आणि प्रदेश नेतृत्वाबद्दल जोरदार नाराजी व्यक्त केली. काँग्रेसकडे निवडणूक जिंकण्यासाठी कोणताही कार्यक्रम आणि यंत्रणा नसल्याचा गंभीर आरोप त्यांनी केलाय.

## भाजपने कसला विकास केला, नक्षलवाद संपवला तो उद्योगपतींसाठी : संजय राऊतांचा हल्लाबोल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***गडचिरोली*** – गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू, तर तीन विद्यार्थिनी जखमी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त करत राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रात आदिवासींचा मृत्यू इतका स्वस्त झाला आहे का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी महायुती सरकारवर कडाडून टीका केली आहे.

कसला विकास? आदिवासींना उपचारही मिळत नाहीत संजय राऊत म्हणाले, 'वाघ, बिबटे, जंगली प्राणी आणि साप हे आदिवासींच्या घरात आणि शाळांमध्ये घुसून बळी घेत आहेत. तुम्ही गडचिरोलीचा नक्षलवाद संपला असे म्हणत आहात, पण आदिवासींचे मृत्यू थांबलेले नाहीत. ते अशा पद्धतीने मारले जात आहेत. तुम्ही आदिवासींचा कसला विकास करत आहात? त्यांना साप अथवा विंचू चावल्यावर उपचार मिळत नाहीत. तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूने जर या राज्याचे सरकार हळहळले नसेल, अस्वस्थ झाले नसेल तर यासारखे निर्दयी सरकार नाही. या राज्यातील सरकारी शाळा, जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था जाऊन बघा, तुमच्या विकासामुळे त्यांना काय मिळत आहे?' असा थेट त्यांनी उपस्थित केला. जवळपास १५०० लोक मारले गेलेत गडचिरोलीतील खाण उद्योगावर थेट निशाणा साधताना संजय राऊत म्हणाले, 'गडचिरोली जिल्ह्यात जो खाण उद्योग आहे, तिथे हजारो-लाखो वाहने चालत आहेत. त्या वाहनांखाली गेल्या वर्षभरात १५०० आदिवासी चिरडून मेले आहेत. एफआयआर नको म्हणून त्यांचे मृतदेहसुद्धा गायब केले जातात. पाच मिनिटांत ती बॉडी हलवली जाते, पाणी मारून रक्त साफ केले जाते आणि पुरावे नष्ट केले जातात. हा साधारण एक-दीड वर्षाचा आकडा आहे आणि याची नोंद कुठेही ठेवली जात नाही. जवळपास १५०० लोक मारले गेले आहेत,' असा दावा त्यांनी यावेळी केला.

## पालघर जिल्हा हादरला! जव्हारला भूकंपाचे सलग धक्के! ४ वेळा हादरली जमीन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**पालघर** – जिल्ह्यातील जव्हार परिसराला सोमवारी रात्री भूकंपाच्या सलग धक्क्यांनी हादरवून सोडले.

रात्री १० वाजल्यानंतर काही तासांच्या अंतराने जाणवलेल्या कंपनांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक नागरिकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली आणि रस्त्यावर आश्रय घेतला. काही नागरिकांनी मध्यरात्रीनंतरही घरात जाणे टाळल्याने जव्हारवासीयांनी अक्षरशः भीतीच्या सावटाखाली रात्र जागून काढली.

रात्री दोन मोठे धक्के; नागरिकांमध्ये घबराट सोमवारी रात्री १०.०४ वाजता ३.२ तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जव्हार परिसरात जाणवला. या भूकंपाचे केंद्र डेंगाचीमेट परिसरात असल्याची प्राथमिक माहिती आहे. अचानक घरांमध्ये कंप जाणवल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. अनेकांनी खबरदारी म्हणून तातडीने घराबाहेर पडत रस्त्यावर थांबणे पसंत केले. काही वेळाने परिस्थिती शांत होत असल्याचे वाटत असतानाच रात्री ११ वाजता पुन्हा ३.४ तीव्रतेचा धक्का जाणवला. दुसरा धक्का तुलनेने अधिक तीव्र असल्याने नागरिकांची चिंता आणखी वाढली.

